
**करियर कट्टा अंतर्गत राबविण्यात आलेली उपक्रम**

1. एक दिवसीय आर्थिक कार्यशाळा चे आयोजन.
2. दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन.
3. एम ओ यु.
4. करिअर कट्टा अंतर्गत रोजगार मेळावा.
5. करिअर कट्टा अंतर्गत महाज्योती सर्टिफिकेट कोर्स.
6. आजादी का अमृत महोत्सव निमित्य करियर कट्टा अंतर्गत कौशल्य विकास कार्यशाळा आयोजन.
7. करिअर कट्टा अंतर्गत एकलव्य मार्गदर्शन कार्यशाळा.
8. कॉलेज समन्वयकाद्वारे करियर कट्टा अंतर्गत राबविलेले विविध ट्रेनिंग प्रोग्राम अटेंड केले.




# श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालयात 'करिअर कट्टा' उपक्रमाचे उद्घाटन



**सवना (वार्ता) :** श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद संचलित श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करियर कट्टा' या उपक्रमाचे दिनांक ६ जानेवारी २०२२ ला उद्घाटन व उपक्रमास प्रारंभ झाला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून महा. प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. शंकर ठाकरे, मार्गदर्शक म्हणून डॉ. सुरेल झोड यांची विशेष उपस्थिती होती. सदर उपक्रम हा रोजगाराभिमुख असून या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात असलेल्या विविध संधींची माहिती उपलब्ध होणार आहे. करियर कट्टा या उपक्रमाच्या माध्यमातून आय. ए.एस. आपल्या भेटीला तसेच उद्योजक आपल्या भेटीला, असे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त व नियमित मार्गदर्शन पर वर्ग अगदी नाममात्र शुल्कामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सदर करियर कट्टाच्या उपक्रमांकरिता विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी करावी लागणार आहे. ऑनलाइन उपक्रमाकरिता विद्यार्थ्यांनी नोंदणी केल्यानंतर विविध ऑनलाइन कोर्सेस संदर्भात तसेच अनेक तज्ज्ञांकडून मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे. अगदी अल्प खर्चामध्ये शासनाने सुरू केलेल्या सदर उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा आणि आपल्या यशस्वी कारकिर्दीस प्रारंभ करावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले यांनी केले. मार्गदर्शक डॉ. सुरेल झोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे सांगितले की करियर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी कशा प्रकारे उपयोगी आहे. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. शंकर ठाकरे यांनी विद्यार्थ्यांनी स्वतः मधील कलागुण ओळखून त्यादिशेने भविष्याचे नियोजन करावे असे सांगितलेल. तसेच विद्यार्थ्यांनी या उपक्रमात भाग घेण्यास प्रोत्साहित केले. कार्यक्रमाच्या प्रस्तावने द्वारे करिअर कट्टाचे समन्वयक प्रा. डॉ. पंकज सा. चौधरी यांनी प्रस्तुत उपक्रमासंदर्भात मार्गदर्शन केले व नावीन्यपूर्ण अशा या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवून ऑनलाइन शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून विद्यार्थी जिथे असतील तिथून शिकण्याची ही संधी स्वीकारावी आणि संधीचे सोने करावे, असे आवाहन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.डॉ. निसर्ग आडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. नासिर शेख याने केले. सदर कार्यक्रमास कोरोना नियमांचे पालन करून प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# … क्रांतिज्योती सावित्रीबाई फूले जयंती साजरी



Principal
Shri Vitthal Rukmini Arts, Comm. & Science College










Principal
Shri Vitthal Rukmini Arts,
Comm. & Science College
Sawana Tq. Mahagaon













Principal
Shri Vitthal Rukmini Arts,
Comm. & Science College
Sawana Tq. Mahagaon

जावधणा ठरू शकतो त्यामुळे आपण ... आदेश देऊन योग्य ते कारवाई करून जनतेचा जीव जाणार

# श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालयामध्ये एक दिवसीय आर्थिक साक्षरता कार्यशाळेचे आयोजन




**विदर्भ मतदार प्रतिनिधी**

**सवना:** श्री शिवाजी शिक्षण संस्था, पुसद द्वारे संचालित श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना येथे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज प्रोग्रॅम (इडए) व करिअर कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आर्थिक कार्यशाळेचे दि. ०९ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे आयोजन आभासी पद्धतीने करण्यात आले या कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले होते.

या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून गौरी अमित गौर एक्सपर्ट इन फायनान्शियल लिटरसी नाशिक हे होते. या कार्यशाळेमध्ये फायनान्शिअल प्लॅनिंग, इन्व्हेस्टमेंट, म्युच्युअल फंड आणि अवेअरनेस अन कॅपिटल मार्केट या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक समन्वयक प्रा. पंकज सा. चौधरी तर आभार प्रदर्शन दिक्षा शेट्टी- बॉम्बे स्टॉक एक्सचेंज समन्वयक नाशिक यांनी केले. या कार्यशाळेसाठी सर्व महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



विदर्भ

पुसदः अ... विश्वेश्वरय्या इंजि... असोसिएशन पुसद त... घेण्यात येत आहे. त... हिराणी तंत्रनिकेतन मह... अभियंता चषक क्रिके... करण्यात आले होते. स... मोहिनी इंद्रनिल नाईक यां... उद्घाटन नितीन भुतडा ... यवतमाळ वाशीम लोकसभ... केले. याप्रसंगी सार्व... विभागाच्या कार्यकारी अ... उप विभागीय अभियंता प्रव... रवी देशपांडे उपस्थीत हो... अनवर अली यांनी व अ... देशमुख यांनी मानले. जाबाज, रोहित एस. एस. सिग्हिल स्ट्रायकर, बजा... ११ या सहा संघांनी स... पाचही संघातील खेळा... निवड करण्यात आली. ...

Principal
Shri Vitthal Rukmini Arts, Comm. & Science College
...ana Tq. Mahagaon

या कार्यक्रमाचे औचित्य साधून कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक चेतन कांबळे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या पुस्तक पेढी मार्फत गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासाची पुस्तके निःशुल्क स्वरुपात विद्यार्थ्यांना देण्यात आले.

यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ व पुस्तक स्वरुपात भेट देण्यात आली. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विजय चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून कार्यक्रमाची सांगता केली.

# श्री विठ्ठल रुक्मिणी महा. मध्ये कौशल्य विकास कार्यशाळा



**सवना(विदर्भ मतदार प्रतिनिधी) :** श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद द्वारा संचालित श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना येथे एक दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळा ०४ ऑगस्ट रोजी संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले हे अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख उपस्थित व मार्गदर्शक म्हणून जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यवतमाळ महाराष्ट्र शासन येथील अधिकारी श्रीमती विद्या सा. शीतोळी सहाय्यक आयुक्त व कर्मचारी नितीन अ. खडसे, श्रीमती सुचिता म. घाडगे, शुभम वाळोंदे आणि ज्येष्ठ प्रा. जयस्वाल, झोड तथा कार्यक्रम अधिकारी होते. कोणत्याही कामात यशस्वी होण्यासाठी कौशल्य असणं खूप गरजेचं आहे. तुमच्याकडे कौशल्य असेल तर त्या कामात यश मिळण्याची शक्यता वाढते. नोकरी असो वा व्यवसाय, सर्वत्र कौशल्ये महत्वाची असतात. असे सहाय्यक अधिकारी शितोळे यांनी स्पष्ट केले. अंगभूत कौशल्य म्हणजे काय? जे गुण माणसाच्या अंगी उपजत असतात, त्याला जन्मजात अवगत असतात त्याला अंगभूत कौशल्य म्हणतात. याविषयी प्राचार्य महल्ले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजक प्रा. डॉ. पंकज सा. चौधरी यांनी कौशल्य विकास यासंदर्भात विचार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी प्रा. इंगोले, गायकवाड, चौधरी, कुणाल, प्रा. ताथोड मॅडम, प्रा. तायडे मॅडम, प्रा. नरवाडे मॅडम, काळे, खाडे, ज्येष्ठ प्रा. शेख यांनी परिश्रम घेतलेत.

**पात्रता :** १०वी / संबंधीत स्टेनोग्राफर आणि टायपिंग, कोणत्याही शाखेतील पदवीधर आणि शारिरीक शिक्षण पदवी

**वयोमर्यादा :** १८ ते ४० वर्ष (मागासवर्गीय ५ वर्ष अधिक)

**परीक्षा शुल्क :** खुला प्रवर्ग – १००० रु. व मागासवर्गीय – ९०० रु.

**ऑनलाईन अंतिम तारीख :** १०/०८/२०२३

**संदर्भ :** www.sports.maharashtra.gov.in

## एकलव्य मॉडेल निवासी शाळा (EMRS) –६३२९ पदे

**पदाचे नाव :** प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (TGT) – ५६६० पदे (खुला–२३३५ / आर्थिक दुर्बल घटक–५५८/ ओबीसी–१५१७ /अनु. जाती– ८३७ / अनु. जमाती – ४१३ पदे) / हॉस्टेल वॉर्डन ( पुरुष ) – ३३५ पदे ( खुला – १३७ / आर्थिक दुर्बल घटक – ३३/ओबीसी–९०/अनु.जाती– ५०/ अनु.जमाती– २५ पदे)/हॉस्टेल वॉर्डन (महिला) – ३३४ पदे ( खुला – १३६ / आर्थिक दुर्बल घटक – ३३ / ओबीसी – ९० / अनु.जाती–५०/अनु.जमाती – २५ पदे)

**पात्रता :** पदवीधर आणि बीएड / पदवीधर किंवा NCERT किंवा इतर NCTE मान्यताप्राप्त संस्थेच्या रीजनल कॉलेज ऑफ एज्युकेशनचा चार वर्षांचा एकात्मिक पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण

**वयोमर्यादा :** १८ ते ३५ वर्ष (अनु. जाती / जमाती करीता ५ वर्ष अधिक) (ओबीसी करीता ३ वर्ष अधिक)

**परीक्षा शुल्क :** ओपन / ओबीसी / आर्थिक दुर्बल घटक करीता – १५०० रु. व १००० रु. संबंधीत पदानुसार ( अनु. जाती/ जमाती / अपंगाकरीता शुल्क माफ ) परीक्षा केंद्र (महाराष्ट्राकरीता) : मुंबई

**ऑनलाईन अंतिम तारीख :** १८/०८/२०२३

**संदर्भ :** www.emrs.tribal.gov.in

**सौजन्य – शिवाजी डोंगरे, सोमेश्वर नोकरी संदर्भ, रुक्मिणी नगर, अमरावती**

वाव देण्याकरिता विविध स्प... आयोजन करण्यात आले. या ... भरपूर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्या मध्ये मातीची श्री गणेशाची मूर्ती तयार करणे या स्पर्धेमध्ये प्राची संजय

कुणाल अविनाश राठोड, ...त ऋतुजा संतोष राठोड, ...कुम संजय राठोड, अनिकेत सुशील राठोड, कल्याणी चव्हाण,

एडतकर, शालेय मुख्य... पी.एस. मंठणकर तसेच शि... शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी वि... विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालयामध्ये दोन दिवसीय आर्थिक साक्षरता कार्यशाळेचे आयोजन




**विदर्भ मतदार प्रतिनिधी**

**सवना:** श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद संचालित श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना मध्ये करियर कट्टा, महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र व चॉईस ब्रोकिंग (रजिस्टर विथ सेबी, एनएसइ, बीएसइ )यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आर्थिक साक्षरता कार्यशाळेचे २५ आणी २७-०९-२३ रोजी आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे मार्गदर्शन करण्यासाठी करियर कट्टा समन्वय प्रा. पंकज सा.चौधरी व प्रा. डॉ. गावंडे वाणिज्य विभाग यांचे द्वारे ऑनलाईन, ऑफलाइन, प्रॅक्टिकल, पावर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये बदलत्या शिक्षण प्रणाली सोबत बदलते आर्थिक गणित समजून घेण्या बद्दल मार्गदर्शन केले आणि आर्थिक कार्यशाळेचे महत्व समजावून सांगितले. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्रा. सुरेल झोड, नॅक कॉर्डिनेटर प्रा.प्रदीप जयस्वाल उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. निसर्ग आडे तर आभार प्रदर्शन प्रा. ढोले यांनी केले. या कार्यशाळेला उपस्थित असलेले १०२ विद्यार्थी यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी करिअर कट्टा महाराष्ट्र शासन व चॉईस ब्रोकिंग महाविद्यालयातर्फे आभार मानण्यात आले.


# ... चिखली (कॅम्प) येथे बक्षीस वितरण ... संपन्न

...करून ...प्रणेते ...प्रतिमेचे ...माच्या स्वागत ...देऊन ...आले. ...ी यांनी



Principal
Shri Vitthal Rukmini Ar...
Comm. & Science Co...
Sawana Tq. Mahaga...

# श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना येथे भव्य रोजगार मेळावा उत्साहात संपन्न



सवना(वार्ता): श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद द्वारा संचालित श्री विठ्ठल-रुक्मिणी महाविद्यालया मध्ये स्व. बाळासाहेब देशमुख सवनेकर स्पर्धा परीक्षा विभाग व करियर कट्टा अंतर्गत भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याचे उद्धाटन ग्रेस. एजु. नेटचे संस्थापक अध्यक्ष विनोद कापसे या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले होते. व्यासपीठावर उपस्थित प्रमुख पाहुणे संदीप नांदेडकर, प्रा. पी. पी. जयस्वाल, स्पर्धा परीक्षा समन्वयक डॉ. पंकज चौधरी उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तद्नंतर प्रा. चौधरी यांनी कार्यकमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी विनोद कापसे यांनी या मेळाव्याचे उद्देश, रोजगाराच्या संधी नियम व अटी कशाप्रकारच्या आहेत हे उपस्थित विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. अध्यक्षीय भाषणामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले यांनी आपले मत व्यक्त करतांना ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांना हे रोजगाराचे आयोजन किती महत्वाचे आहे हे सविस्तर विषद करून आम्ही भविष्यात आपल्या महाविद्यालयात रोजगार मेळाव्याचे आयोजन होतच राहील त्यासाठी त्या पद्धतीने विद्यार्थ्यांनी आपली तयारी करावी अशी महत्वपूर्ण माहिती विशद केली. या रोजगार मेळाव्याच्या मुलाखतीसाठी एकूण ९२ विद्यार्थी उपस्थित होते. या पैकी मुलाखती पश्चात ३६ विद्यार्थ्यांची या रोजगार मेळाव्यात नियुक्ती झालेली आहे व तेव्हाच त्यांना नियुक्तीपत्र सुध्दा देण्यात आले या कार्यकमाचे सूत्रसंचालन डॉ. स्वाती ताथोड तर आभार प्रदर्शन प्रा. कु. पल्लवी नरवाडे यांनी केले या मेळाव्याच्या यशस्वितेसाठी प्रा. गायकवाड प्रा. खाडे, प्रा. वासेकर, प्रा. नानेर, कांबळे, प्रा. भावना तायडे, प्रा. ढोकणे व इतर महाविद्यालयाचे कर्मचाऱ्यांनी मदत केली.

# जि.प. शाळा वेणी (बु) चे नवोदय परीक्षेत यश

महागांव (ता. प्र.): जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा वेणी पं. स. महागाव येथे दि.२३ जुलै २०२२ रोजी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. जि. प. शाळा वेणी शाळेतील विद्यार्थी लव रामचंद्र पुंडे याने नवोदय परीक्षेत घवघवीत यश संपादन केले.

शाळेतील इतर विद्यार्थ्यांना नवोदयसह अन्य स्पर्धा परीक्षांत यश संपादनासाठी प्रेरणा मिळावी या हेतूने शाळेतील विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास वेणी गावचे सरपंच परसरामजी पुंडे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष प्रभाकर पुंडे, शाळेतील शिक्षक सुरेश के. राठोड, भुजंग इंगोले, भारती शेळके यांनी विद्यार्थ्यांनी नवोदय परीक्षेत कसे यश संपादन करावे याचे नियोजना बाबत आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना आपले भविष्य उज्ज्वल करण्यासाठी लागणाऱ्या सुविधांपेक्षाही सुयोग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते, जी या शाळेतील गुरुजनांनी अथक परिश्रमातून ती साकार केली. या शाळेच्या नावलौकिकात मोलाची भर टाकणाऱ्या लव पुंडे या विद्यार्थ्याने आपल्या यशाचे श्रेय आई-वडिल, गुरुजन, सहकारी मित्रबांधवांना दिले आहे. विद्यार्थी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणाऱ्या गुरुजनांच्या पाठिशी आम्ही भक्कमपणे असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले. शाळेला गावाचा आधार असावा, गावाला शाळेचा अभिमान असावा. ही उक्ती प्रत्यक्षात येत असल्याचे पाहून सर्वजण यावेळी सद्गदित झाले. कार्यक्रम अतिशय आनंदमय झाला.



परिपाठामुळे विद्यार्थी संस्कारमय

जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ
सिव्हिल लाईन, यवतमाळ
दूरध्वनी क्र. (०७२३२) २४२४८८
(०७२३२) २४२२११
वेबसाईट-www.yavatmal.nic.in
ई-मेल-rdc.yavatmal@rediffmail.com

Principal
Shri Vitthal Rukmini Arts
Commerce & Science College
Sawana Mahagaon